सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कालमर्यादीत** क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२६/ 1340
**प्रति,** दिनांक :- 26 MAY 2026

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/Intake Approval/२०२६/२०१ दिनांक २५/५/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७मधील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेची माहिती अचूक व अद्ययावत असने आवश्यक आहे. सदर माहितीशी संबंधीत आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करुन माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. सदर विषयाबाबत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती ऑनलाईन प्रणालीवर अद्ययावत करुन आवश्यक कागदपत्रासह खाली दिलेल्या **जिल्हानिहाय वेळापत्रक नुसार** आपणास दिलेल्या दिनांकास या कार्यालयात आवश्यक मान्यतेच्या पत्रासह प्रत्यक्ष उपस्थित राहून या कार्यालयाच्या लॉगिन मधून अद्ययावत करुन घ्यावी.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | जिल्हा | उपस्थित राहावयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रम** | बुलढाणा | ०२/०६/२०२६ |
| २ | | वाशिम | ०३/०६/२०२६ |
| ३ | | यवतमाळ | ०४/०६/२०२६ |
| ४ | | अमरावती | ०५/०६/२०२६ |
| ५ | | अकोला | ०५ /०६/२०२६ |

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांना https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी Diploma Intake Approval २०२६-२७ या शिर्षाखाली (टॅबव्दारे) ऑनलाईन प्रणालीची लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येत आहे.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/३५६/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :
क्रमांक : १०/एडीएम/Intake Approval/२०२६/ २०१ दिनांक : 25 MAY 2026

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद अशा शिखर परिषदांद्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीताची मान्यता प्रक्रिया सुरु असुन पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना या शिखर परिषदांद्वारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी/वास्तुकला पदविका, प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी व सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी आणि थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी / वर्किंग प्रोफेशनल तुकडीचे थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे ऑनलाईन पद्धतीने पार पाडल्या जातात. सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दि. २२ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांना https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी Diploma Intake Approval २०२६-२७ या शिर्षाखाली (टॅबव्दारे) ऑनलाइन प्रणालीची लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

सदर विषयाबाबत संबंधितांनी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि. २४ जून २०२६ पर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ - यांना संलग्नता/समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचीत कार्यवाहीस्तव.

# Directorate of Technical Education, Maharashtra State

## Intake Approval System – Academic Year 2026-27

*(परिपत्रक क्रमांक: 10/एडीएम/Intake Approval/2026/201 , दिनांक :25/05/2026)*

## GENERAL INSTRUCTIONS

All institutes conducting Diploma Courses are hereby informed to verify the correctness of already submitted data, or update their institute data related to courses approved for academic year 2026-27 by AICTE / PCI / CoA (as applicable) through their Institute Login immediately.

All Institutes shall exercise this check/update activity with utmost care, as this data shall be used for seat allotment and admissions. The Principal / Director of the institute shall be personally responsible for incorrect allotment if the data checked / updated by the institute is found inconsistent with approvals granted by the appropriate authorities.

## UPDATABLE INFORMATION FOR ACADEMIC YEAR 2026-27

### A. Institute-Level Details:

- Institute Details & Institute Status
- Contact details of Principal / Director and Registrar
- Approval Letters
- AISHE Code
- Hostel Information
- Faculty Details
- Beneficiary Details
- Placement & Internship data
- Pass-out Data
- Fee Structure
- DIGIPIN

### B. Course-wise Details:

| Detail | Editable | View Only |
|---|---|---|
| Previous AY (2025-26) Intake as per GR | — | 👁 |
| Intake as per approval letter from AICTE / PCI / CoA | ✓ | — |
| Intake as per Government Resolution (GR) | ✓ | — |
| Intake as per University / Board affiliation | ✓ | — |
| Intake & Remark as per Hon. Court directives (updated by RO/DTE) | — | 👁 |
| NRI / FN / OCI / CIWGC / PIO Approval as per Apex Body | ✓ | — |
| Accreditation status – Institution (NAAC) / Course (NBA) [Pre-Qualifier \| SAR \| NBA \| Reason for ineligibility] | ✓ | — |
| Upload: Approval / Affiliation / GR / Court Order / Accreditation / etc. | ✓ | — |
| Seat Surrender (if any) – Un-aided Institutions | ✓ | — |
| Verify Institute Profile along with Seat Surrender | ✓ | — |

> **Note:** *The Final Intake for Admission for academic year 2026-27 shall be calculated automatically by the system based on the above inputs. Seat distributions shall be displayed considering the institution status and Seat Surrender (if any).*

## INSTRUCTIONS FOR INSTITUTES

1. Visit the DTE portal:
   https://dte.maharashtra.gov.in or https://approval26.dtemaharashtra.gov.in
2. Login using your Institute Code and Password (same credentials used for the DTE Portal).
3. Newly approved institutes (2026): Contact DTE Office to obtain your DTE Code and login credentials, then contact the concerned Regional Office for approval.
4. If new courses are approved by the Apex Body, the Institute shall contact the concerned Regional Office.
5. View, Check, Update, and Confirm all data by **22nd June 2026** for all Diploma Courses.
6. Details cannot be edited once confirmed. Review carefully before confirming.
7. The system shall auto-generate the Institute Profile for Diploma Courses upon confirmation.
8. Upload a scanned copy of the Institute Profile, duly signed and sealed, through the Institute Login.
9. The Regional Office of DTE shall verify the uploaded signed and sealed Institute Profile and approve the same, issuing an acknowledgement. The RO may Edit / Add / Delete Courses and shall revert approval in case of any discrepancy. The Institute shall comply with the query and re-submit.
10. Key information pertaining to CAP (Centralized Admission Process) data shall be available in the public domain.

## INSTRUCTIONS FOR REGIONAL OFFICES (RO)

1. Visit the DTE portal:
   https://dte.maharashtra.gov.in or https://approval26.dtemaharashtra.gov.in/
2. Login with the Regional Office ID and Password. RO shall create Sub-RO Officer accounts as required.
3. Verify, Edit, and Approve the details submitted by the Institute by **24th June 2026** for all Diploma Courses. RO Officers may view and verify uploaded documents.
4. Upload scanned copy of the Acknowledgement of Institute Profiles (Diploma Courses) duly signed and sealed through the RO Login.
5. Ensure that the Institute has filled all required details before approval.
6. Institutes shall receive confirmation status within their login upon RO approval.
7. For any corrections, the Institute shall contact the RO. The RO may revert approval of specific course(s) in case of discrepancy and re-approve after re-submission by the Institute.

**Additional RO Capabilities:**

- Broadcast Messages / Send customised messages to selected institutions
- Download / Export various predefined Reports from time to time
- Monitor the approval / pending status of all Institutions within their region

## KEY DATES AT A GLANCE

| Activity | Responsible | Deadline |
|---|---|---|
| Verify / Update & Confirm Institute Data (Diploma) | Institute | **22nd June 2026** |
| Upload Signed & Sealed Institute Profile | Institute | **22nd June 2026** |
| Verify, Approve & Issue Acknowledgement (Diploma) | Regional Office | **24th June 2026** |

-x-